**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात</u>**
**<u>गुन्ह्याचा तपशील</u>**

**सं.फौ.ख.नं.१८९१/२०२६ (गु.र.क्र.१५२५/२०२६)** **निशाणी क्र.०२**

**आर.पी.एफ. दौंड विरुध्द दिपक जितेंद्र कुमार पटेल,**

१. अपराध घडल्याची तारीख **: २५.०६.२०२६**

२. अहवालाचा/फिर्यादची तारीख **: २५.०६.२०२६**

३. फिर्यादीचे नांवः **: निरीक्षक**
**आर.पी.एफ. दौंड जि पुणे**

४. आरोपीचे नांवः **: दिपक जितेंद्र कुमार पटेल,**
**वयः २१ वर्षे, धंदा- मजुरी**
**पत्ताः भरदा ता करछना खोर्ड, इलाहाबाद**

५. गुन्ह्याचा तपशील -

तुम्ही दिनांक २५.०६.२०२६ रोजी २१.१८ ते २१.२० वाजताच्या दरम्यान गाडी क्र. १७६१३ रेल्वेमध्ये वैध कारणाशिवाय अलार्म चैन ओढल्यामुळे भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न क्र.१ः तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.२ः तुम्हाला आता आरोप वाचुन दाखविला व समजावुन सांगितला तो समजला काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.३ः तुम्हाला गुन्हा कबुल आहे ?

उत्तरः होय, स्वतःच्या इच्छेने गुन्हा कबुल करीत आहे.

स्थळः दौंड.
दिनांकः ०२.०७.२०२६.

समक्ष,

Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2026.07.02 16:19:37 +0530

-------------
आरोपीची सही

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## <u>कारणमिमांसा</u>

आरोपीला त्याच्यावर असलेला दोषारोप वाचुन दाखविले असता, त्याने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला आहे. शिक्षेबाबत आरोपीला विचारले असता, त्याने असे निवेदन केले की, तो गरीब असुन कुटुंबातील एकमेव कमवता व्यक्ती असुन कुटूंबाची पालनपोषणाची जबाबदारी आरोपीवर आहे. त्यामुळे, शिक्षा देताना कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केल्यावरुन असे स्पष्ट होते की, त्याला त्याच्या कृतीबाबत पश्चाताप होत आहे. आरोपीचे वय, गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल या तथ्यविषयक व विधिविषयक निष्कर्षास मी येत आहेः

## <u>आदेश</u>

१. आरोपी नामे **दिपक जितेंद्र कुमार पटेल** यांस भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र असणाऱ्या गुन्ह्यांसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येते व आरोपीला रक्कम रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येते. आरोपीने उपरोक्त द्रव्यदंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीस पाच दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

Digitally signed by
SUNIL SHARAD
DAHATONDE
Date: 2026.07.02
16:19:42 +0530

स्थळः दौंड,
दिनांकः ०२.०७.२०२६.

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.